नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 16/07/2021 (शुक्रवार)
(सायंकाळ)

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

1) पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत 12 कि. मी. अंतरावर मौजा मानेगाव टेक शिवार एनएच 44 हायवे येथे दिनांक 15/07/2021 चे 02.00 वा. ते 02.45 वा. दरम्यान देवलापार पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, एक इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन देवलापार पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम.एच.– 30/ एबी – 4236 क्रमांकाच्या महिन्द्रा कंपनीची झेनॉन योध्दा गाडीला थांबवुन वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनात एकुण 06 गाई कि. 55,000/–रू. ही जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना आरोपी नामे– सचिन धनराज हिंगे, वय 25 वर्ष, रा. हनुमान नगर येरलीपुरा कामठी हा मिळुन आला. आरोपीच्या ताब्यातुन गोवंश व वाहनासह एकुण किंमती 4,80,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस नाईक मिथीलेस पांडे, पो.स्टे. देवलापार यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. देवलापार येथे वरील आरोपीतांविरुध्द कलम 11 (1)(डी)(एफ)(एम) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5(अ) 9 महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीला अटक करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. केशव पुंजरवाड 8668865203 हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक श्री. प्रवीण बोरकुटे, पोलीस उपनिरीक्षक श्री. केशव पुंजरवाड, पोलीस नाईक मिथीलेस पांडे, प्रमोद मडावी व पोशि गजानन जाधव यांनी पार पाडली आहे.



2) पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 02 कि. मी. अंतरावर उमरेड रोड तुलसी सिडी कॉम्लेक्स जवळ बुटीबोरी येथे दिनांक 15/07/2021 दरम्यान बोरी पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन बोरी पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एम. एच.– 32/बी– 4108 क्रमांकाच्या पिकअप झेनॉन गाडीला थांबवुन चेक केले असता वाहनामध्ये एकुण 04 बैल कि. 60,000/–रू. ही जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपी क्र. 1) आशिष राजेश सोनटक्के रा पवनार वार्ड क्र 2 सेवाग्राम रोड जि. वर्धा, 2) शेख सलमान शेख नूर वय 21 वर्ष, रा. पूलफाईल रहिमानीया मज्जीद जवळ ता.जि. वर्धा व 3) ईस्माईल अब्दुल हमीद शेख वय 45 वर्ष, रा. पूलफाईल रहिमानीया मज्जीद जवळ ता.जि. वर्धा यांच्या ताब्यातुन वाहनासह एकुण किंमती 2,60,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे सहायक फौजदार संजय खंडारे पो.स्टे. बोरी यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे वरील आरोपीतांविरुध्द कलम 11(1)(घ)(ड)(च) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5(अ)9 महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, सहकलम 109 भादवी तसेच कलम 184, 177, 130, 86 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांना सुचनापत्रावर रिहा करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार संजय खंडारे 9923159153 हे करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक राहुल माकणीकर, उपविभागीय पोलीस अधिकारी नागपूर विभाग श्री चव्हाण यांचे मार्गदर्शनात, पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सफौ संजय खंडारे व ठाकुर यांनी पार पाडली आहे.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर